पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 14/02/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## जबरी संभोग

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– दिनांक 09/02/2020 चे 00:01 वा. ते दिनांक 12/02/2020 चे 23:59 वा. सुमारास 22 वर्षीय पिडीत/फिर्यादी हीला आरोपी नामे– प्रशांत नगरारे, रा. टाकळघाट याने देवस्थान येथे दर्शनाकरीता नेले. यानंतर आरोपीने पीडीतेस स्वतःच्या घरी नेवुन धमकी देत पिडीतेसोबत बळजबरीने जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 376, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक पल्लवी काकडे 9156283876 या करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक 13/02/2020 चे 16.00 वा. दरम्यान 23 वर्षीय फिर्यादी/पीडित ही घरी हजर असतांना आरोपी नामे– रंजित तेजराम पारडकर, वय 35 वर्ष, रा. आरंभी ता. नरखेड याने पीडितेच्या घराचे लोखंडी गेट उघडुन घराचे समोरील दाराच्या समोर येवुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर पीडिता ओरडली असता पीडितेचा पती बाहेर आल्यावर आरोपीने अश्लिल शिवीगाळ करून पतीला व सासुला हातबुक्कीने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354, 323, 294, 509 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ अनिल जोशी 7499760728 हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– दिनांक 16/12/2019 चे 16.00 वा. ते 16:30 वा. दरम्यान 19 वर्षीय फिर्यादी/पीडित हिला आरोपी नामे क्र. 1) सुरेश डवले याने मोठया पदावर नोकरीस ठेवतो तुला फिरायला घेउन जातो. असे आमीष देउन पीडिते सोबत अश्लिल चाळे करून तिचा विनयभंग करीत असतांना, आरोपी क्र. 2) सुशिल ठाकरे व 3) मनोज महंतो तिन्ही रा. गोविज्ञान अनुसंधान केन्द्रं देवलापार यांनी इलेक्ट्रानिक माध्यमाव्दारे व्हिडीओ तयार करून प्रसारित करून पीडितेची समाजात बदनामी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ)(1)(अ)(i)(ii), 417, 500 भादंवी. सहकलम 67 (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. चव्हाण हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर मौजा वाकी येथे दिनांक 10/02/2020 चे 15:00 वा. ते 17:30 वा. सुमारास भास्कर कचरूजी बागडे, वय 48 वर्ष, रा. खापा याने दारूच्या नशेत राहत्या घरी सिलींग फॅनला दुपट्टा बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रतिक भास्कर बागडे, वय 18 वर्ष, रा. खापा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार लोंढे 9850900768 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर मौजा कोलार येथे दिनांक 08/02/2020 चे 20.30 वा. दरम्यान यादवराव दगडुजी ठाकरे, वय 65 वर्ष, रा. कोलार यांनी स्वतःच्या घरी उंदीर मारण्याचे पावडर टाकले व हात न धुता तंबाखु घोटुन खाल्ले व जेवण सुद्धा केले. रात्री 09:00 वा. दरम्यान त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता वैद्यकीय अधिकारीने त्यांना तपासुन दि. 09/02/20 चे 03:25 वा. मृत घोषित केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विलास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक अतुल शेंडे 8208101785 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर खापा जुनी वस्ती प्रभाग क्र. 6 येथे दिनांक 09/02/2020 चे 11.30 वा. दरम्यान नारायण कृष्णा गाडीगोने, वय 44 वर्ष, रा. खापा यांनी अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता दि. 09/02/20 चे 18:10 वा. त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक संजय दाभाडे, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर